गणेशपूरच्या सौ. शोभा जाधव यांना आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान >>पान 2

डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम राज्यातील प्रत्येक शासकीय शाळेत पोहचणार जागतिक दर्जाचे शिक्षण >>पान 3

सोन्या-चांदीच्या भावात बुलेट ट्रेनच्या वेगाने वाढ! >>पान 4

दैनिक

# आपला विदर्भ


apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 76 ■ सोमवार, दि. 13 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**

आपल्या कार्यात उत्साह ठेवा.



सुपरस्टार अमिताभ बच्चन यांच्या वाढदिवसानिमित्त जलसाबाहेर चाहत्यांची गर्दी

आतील पान



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक आणि सामाजिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल- सरन्यायाधीश

## मंडणगड दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** मंडणगड येथे झालेल्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीमधून समाजाच्या शेवटच्या नागरिकाला कमीत कमी वेळेत कमीत कमी खर्चात न्याय मिळेल, या दृष्टीने आपण सर्वजण प्रयत्नशील रहाल. जेणेकरुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक आणि आर्थिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल, अशी अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केली.

मंडणगड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश श्री. गवई यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री डॉ. उदय सामंत, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, पालक न्यायाधीश न्यायमूर्ती माधव जामदार,



राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस. पी. तावडे, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विनोद जाधव, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमृता जोशी, बार असोसिएशनचे अध्यक्ष अमोल सावंत, सदस्य संग्राम देसाई, वकील संघाचे अध्यक्ष मिलींद लोखंडे, आमदार किरण सामंत, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस >>पान २

## अफगाणिस्तानच्या कारवाईत ५८ पाकिस्तानी सैनिक ठार

**काबुल :** अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री भारत दौऱ्यावर असताना पाकिस्तानने अफगाणिस्तावर एअर स्ट्राईक अर्थात हवाई हल्ला केला. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून अफगाणिस्तानने पाकिस्तान विरोधात लष्करी कारवाई सुरू केली. या कारवाईत आतापर्यंत पाकिस्तानचे ५८ सैनिक ठार झाले आणि ३० सैनिक जखमी झाले आहेत. पाकिस्तानच्या २५ चौक्या आणि त्या भोवतालचा परिसर हे सर्व अफगाणिस्तानच्या ताब्यात आहे. ही माहिती अफगाणिस्तानच्यावतीने देण्यात आली आहे. पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या आकडेवारीवर अद्याप भाष्य केलेले नाही. इस्लामिक अमिराती ऑफ अफगाणिस्तानचे प्रवक्ते जबिहुल्लाह मुजाहिद यांनी पाकिस्तानचे ५८ सैनिक ठार झाल्याचे आणि ३० सैनिक जखमी झाल्याचे सांगितले. पाकिस्तानचा मोठा शस्त्रसाठा आणि दारुगोळा जप्त केल्याचे अफगाणिस्तानने जाहीर केले. पाकिस्तान विरुद्धच्या संघर्षात स्वत:चे २० सैनिक मारले गेल्याचे अफगाणिस्तानच्यावतीने सांगण्यात आले. कतार आणि सौदी अरेबिया यांनी केलेल्या विनंतीला मान देत अफगाणिस्तानने पाकिस्तान विरुद्धची लष्करी कारवाई काही तास थांबवली होती. पण ही कारवाई पूर्णपणे थांबवणे अशक्य आहे. पाकिस्तानने केलेल्या हवाई हल्ल्यांचा पुरेपूर बदल घेणार असल्याचे संकेत अफगाणिस्तानच्यावतीने देण्यात आले आहेत. पाकिस्तानच्या भूमीवर आयसिसचे दहशतवादी प्रशिक्षण घेत आहेत. हे दहशतवादी अफगाणिस्तान विरोधात कारवाया करत आहेत.

## पुन्हा एकदा आर्यन खान विरुद्ध समीर वानखेडे

नवी दिल्ली : आर्यन खान विरोधात झालेल्या चर्चित ड्रग्ज प्रकरणात तपास करणारे नारकोटीक्स कंट्रोल ब्युरोचे मुंबई विभागाचे माजी प्रमुख समीर वानखेडे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान दिग्दर्शित असलेल्या ''इरवी ऑफ बॉलीवुड'' या वेब सिरीजविरोधात त्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. ''इरवी ऑफ बॉलीवुड'' ही सीरिज शाहरुख खानच्या रेड चिलीज एंटरटेनमेंट या प्रॉडक्शन हाऊसने तयार केली आहे. ही सीरिज नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाली आहे. या मालिकेत आपली प्रतिमा जाणूनबुजून मलिन करण्यात आली, तसेच काही दृश्यांमधून पोलिस अधिकाऱ्यांचा अपमान करण्यात आला असल्याचा आरोप समीर वानखेडे यांनी केला आहे. समीर वानखेडेंनी मानहानीचा खटला दाखल करत न्यायालयात दाद मागितली आहे. तसेच समीर वानखेडे यांनी त्यांच्या वकिलांमार्फत नेटफ्लिक्स आणि रेड चिलीज एंटरटेनमेंटला नोटीस पाठवली असून, कुटुंबाच्या सुरक्षेसाठी सरकारकडे संरक्षणाची मागणी केली आहे. वानखेडे यांनी एका मुलाखतीत सांगितले की, ''या प्रकरणामुळे माझ्या कुटुंबाला पाकिस्तान, यूएई आणि काही इतर देशांमधून धमकीचे ईमेल्स येत आहेत. मात्र आम्ही घाबरणार नाही.

# बिहारमध्ये एनडीएचे जागावाटप ठरले

## भाजप आणि नितीश कुमार समसमान जागा लढवणार



**मुंबई/प्रतिनिधी :** बिहार विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित केला आहे. भाजप आणि जनता दल युनायटेड प्रत्येकी १०१ जागांवर उमेदवार उतरवणार आहेत. तर चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पक्षाला २९ जागा देण्यात आल्या आहेत. याशिवाय, जीतन राम मांझी यांच्या हिंदुस्तानी अवाम मोर्चाला आणि राष्ट्रीय लोक मोर्चाला प्रत्येकी ६ जागा मिळाल्या आहेत.

भाजपचे बिहार प्रभारी विनोद तावडे यांनी सांगितले की, एनडीएतील सर्व घटकांनी परस्पर सहमती आणि मैत्रीपूर्ण वातावरणात जागांचे वितरण पूर्ण केले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत एकजुटीने लढण्याचा निर्धार एनडीएने केला आहे.

जागावाटपाचा तपशील

भाजप – १०१ जागा

जदयू – १०१ जागा

लोक जनशक्ती पक्ष (रामविलास) – २९ जागा

राष्ट्रीय लोक मोर्चा – ६ जागा

हिंदुस्तानी अवाम मोर्चा – ६ जागा

सौहार्दपूर्ण चर्चेनंतर निर्णय

एनडीएच्या नेत्यांनी सांगितले की, बिहारमधील आगामी निवडणुकीसाठी ही वाटणी परस्पर विश्वास आणि सन्मानाच्या वातावरणात करण्यात आली. तावडे यांनी स्पष्ट केले की, आम्ही एकत्रितपणे निवडणुकीत उतरून विकासाचा >>पान २

# हसन मुश्रीफ यांच्या बालेकिल्लात भाजपाचा शिरकाव; पक्षप्रवेशानंतर मंत्री चंद्रकांतदादांनी केला मोठा दावा

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष जोमाने तयारीला लागले आहेत. प्रत्येक पक्षात कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेश होत आहेत. त्यातच कोल्हापुरातील राजकीय विद्यापीठ समजल्या जाणाऱ्या कागल तालुक्यातील मोठी राजकीय घडामोड घडली आहे. तालुक्यातील मुरगुडचे माजी नगराध्यक्ष व शेतकरी संघाचे माजी अध्यक्ष प्रवीणसिंह पाटील यांनी कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश केला आहे. मुंबईत भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या पक्षप्रवेशामुळे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफांच्या गटाला तालुक्यात मोठा धक्का लागल्याचे सांगितले जात आहे.

प्रवीणसिंह पाटील यांनी याआधी ५० वर्षांहून अधिक काळ मुरगुड तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेससोबत काम केले आहे. सध्या ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खंदे कार्यकर्ते होते. परंतु, वैयक्तिक आणि राजकीय कारणास्तव त्यांनी राष्ट्रवादीला दिलेली साथ सोडत भाजपात प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले आहे. वरिष्ठ नेतृत्वाकडून प्रशासकीय दुर्लक्ष आणि कार्यकर्त्यांबाबत असंबंधामुळे हा निर्णय घेणे भाग पडल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच, होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहता हा पक्षप्रवेश प्रभावी ठरणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले की,



''प्रवीणसिंह पाटील यांच्या पक्षप्रवेशामुळे भाजपाला कागल तालुक्यात मोठा बळकट पाया मिळाला आहे. आगामी निवडणुकीत भाजपाचा प्रभाव वाढेल आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपाची सत्ता मजबूत होईल.'' भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनीही या पक्षप्रवेशाचे स्वागत करत, ''नवीन नेतृत्वाच्या माध्यमातून भाजपा कागल परिसरात अधिक मजबूत होईल,'' असे म्हटले आहे.

# नाशिक रिपाइंचे जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे यांच्या कार्यालयात सापडलं भुयार आणि हत्यारे

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** सातपूर भागातील बारमधील गोळीबार प्रकरणात अटकेत असलेले रिपाइंचे जिल्हाध्यक्ष, माजी नगरसेवक प्रकाश लोंढे याच्या 'धम्मतीर्थ' संपर्क कार्यालयात पोलिसांनी छापा टाकल्यानंतर तेथे भुयार मिळून आले. या भुयारात कुऱ्हाड, चाकूसह आणि अन्य हत्यारांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

नाशिकच्या सातपूर भागातील ऑरा हॉटेलमध्ये प्रोटेक्शन मनी वसुलीसाठी दहशत निर्माण करत केलेल्या गोळीबारात एकजण जखमी झाला होता. यानंतर हॉटेलचालक बिपीन पटेल, संजय शर्मा यांच्यासह कुटुंबाचे अपहरण केल्याप्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात रिपाइंचे जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे त्यांचा पुत्र दीपक लोंढे, संतोष पवार, अमोल पगारे यांना पोलिसांनी अटक केली आहे. या संशयित आरोपींना नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याच दरम्यान आज सातपूर पोलिसांनी लोंढे यांच्या धम्मतीर्थ या कार्यालयावर छापा टाकला. यावेळी त्यांना कार्यालयाच्या एका भिंतीच्या मागे भुयारी रस्ता आढळला. त्यात कुऱ्हाड,चाकू आणि इतर वस्तू आढळून आल्या.

आम्ही प्रकाश लोंढे यांच्या सातपूर येथील कार्यालयाची झडती घेतली. यावेळी एका भिंतीच्या मागे भुयारी मार्गाला जाणारा रस्ता मिळून आला. त्या खोलीत कुऱ्हाड, चाकू आणि इतर साहित्य मिळून आले आहे. ही भुयार खोली नेमकी कशासाठी वापरली जात होती याचा सखोल तपास आम्ही करत असल्याचं पोलीस उपायुक्त किशोर काळे यांनी सांगितलं.

# सामना लिहिणारे राऊत आणि उद्धव यांना कधीच जीआर समजला नाही : आकाश फुंडकर

**बुलढाणा/प्रतिनिधी : राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापलं असून, विरोधकांच्या आरोपांवर कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं. ''सामना पेपर लिहिणारे संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांना कधीच जीआर आणि सरकारी आकडे समजले नाहीत, त्यामुळे त्यांचं सरकार टिकू शकलं नाही,'' असे फुंडकर यांनी स्पष्ट केले.**

## भाजपवर आरोप आणि विरोधकांच्या टीकेवर कामगार मंत्री यांनी जोरदार पलटवार केला

नाना पटोले यांच्या भाजपवरील जातिवाद आरोपावर फुंडकर म्हणाले की नाना पटोले यांची सध्या अवस्था बिकट आहे. काँग्रेसमध्ये त्यांना कोणतंही स्थान नाही. म्हणूनच इलेक्शनच्या तोंडावर ते जाती-जातीमध्ये भांडण पसरवत आहेत. काँग्रेसची पॉलिसी ही समाजात फूट पाडून राजकारणाचा फायदा घेण्याची आहे.

रोहित पवार यांनी आरएसएस नेत्याचं नाव नवी मुंबई विमानतळाला देण्याचा आरोप केला असता फुंडकर म्हणाले की रोहित पवारांना स्वत:चं नाव द्यायचं असेल तर ती त्यांची इच्छा असेल, परंतु सरकार योग्य वेळी जनतेच्या भावना लक्षात घेऊन निर्णय घेईल. संजय राऊत यांनी ''विमानतळाला नरेंद्र मोदींचं नाव देणार'' असे सांगितले, त्यावर फुंडकर म्हणाले की संजय राऊत यांना दिवास्वप्नातही नरेंद्र मोदी दिसतात. आता त्यांनी पश्चाताप करावा कारण उद्धव ठाकरे उद्घाटन सोहळ्यात असते तर आज ते भाषण करत असते, पण आता त्यांच्या हातात काहीच उरलं नाही.

ओवेसी आणि त्यांचा परिवार आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांच्यावर आरोप करत असताना फुंडकर म्हणाले की हे भुंकतात, परंतु मोहन भागवत हे सूर्यासारखे तेजस्वी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी देशाला एकत्र बांधण्याचं काम केलं आहे, त्यामुळे ओवेसींना त्यांच्यावर बोलायची लायकी नाही.

छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेनेच्या शेतकरी मोर्च्यावर फुंडकर म्हणाले की मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे घरात बसले होते, आता रस्त्यावर आले म्हणून



अभिनंदन. महायुती सरकारने शेतकऱ्यांसाठी ३१ हजार कोटी रुपयांचं पॅकेज जाहीर केलं आहे, जे महाराष्ट्राच्या इतिहासात ऐतिहासिक आहे. उद्धव आणि राऊत यांनी नाटक करण्याऐवजी सरकारच्या योजनांचा अभ्यास करावा.

फुंडकर पुढे म्हणाले की सामना पेपर लिहिणारे राऊत आणि उद्धव यांना सरकारी आकडे कधीच समजले नाहीत, त्यामुळे त्यांचं सरकार टिकू शकलं नाही. आज आमच्या आमदारांचा आकडा टिकला आहे. आधी आकडे समजून घ्या आणि मग बोलावं. फुंडकर म्हणाले की शिवसेना (उबाठा गट) आणि काँग्रेस दोघांनाही शासनाचे आकडे, योजनांचे फायदे आणि जनतेच्या भावना समजल्या नाहीत. महायुतीचं सरकार शेतकरी, कामगार आणि सामान्य माणसासाठी प्रामाणिकपणे काम करत आहे.

राज्यात निवडणुकीच्या वातावरणात विरोधक सतत सरकारवर निशाणा साधत आहेत. आकाश फुंडकर यांचे विधान राजकीय ताप वाढवणारे असून, पुढील काळात याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

>>पान २

## चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू : किशोर कुमार

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोर कुमार यांचे निधन झाले. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# विकास कामांचा केला डोंगर उभा, गावाची वाढवली शोभा
# गणेशपूरच्या सौ. शोभा जाधव यांना आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यातील गणेशपूर- पाचंबा गट ग्रामपंचायतच्या लोकनियुक्त सरपंच सौ. शोभा विजयकुमार जाधव यांना आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांनी केलेल्या उल्लेखनीय विकास कामांची दखल पुण्यातील नालंदा आर्गनायझेशनतर्फे त्यांचा गौरव करण्यात आला आहे. सरपंच प्रतिनिधी म्हणून,गणेशपूर, पाचंबा गावाच्या विकासासाठी झटणारे विष्णु बळीराम जाधव यांनी पुणे येथील एका कार्यक्रमात सदर पुरस्कार स्वीकारला आहे. विकास कामांचा डोंगर उभा करून गावाची शोभा वाढविणारा हा पुरस्कार इतरांसाठी आदर्शवत ठरत असल्याचे बोलले जात असून सरपंच जाधव यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सर्व पक्ष समभाव ही भूमिका जोपासत गणेशपुरे, पाचंबा गावाच्या विकासासाठी झटणारे विष्णु जाधव यांचा या पुरस्कारात सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या वहिनी सौ. शोभा विजयकुमार जाधव ह्या २०२३ मध्ये लोकनियुक्त सरपंच म्हणून कार्यरत झाल्या आहेत. तेंव्हापासून विष्णु जाधव हेच सरपंच प्रतिनिधी म्हणून काम पाहत आहेत. त्यांनी आपल्या भागाचे खासदार,आमदार, व सत्ताधारी पक्षाचे माजी आमदार ॲड विजयराव जाधव आणि सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांच्याकडून गावाच्या विकासासाठी करोडो रुपयांची कामे खेचून आणली आहेत. त्यातील बहुतांश कामे पूर्ण झाली असून अनेक विकासात्मक कामे मंजूर करून घेतले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने गणेशपुर येथील स्मशानभूमीचे सौंदर्यीकरण, पेव्हर ब्लॉक, तीर्थक्षेत्र योजनेतून नाथबाबा संस्थान सभा मंडप, दलीत वस्ती अंतर्गत पाचंबा गावातील मुख्य रस्त्याचे काँग्रेटिकरण, पाईपलाईन, शाळेच्या वर्गखोल्या आणि सुशोभीकरण आणि विशेष म्हणजे पाचंबा येथील स्मशानभूमीची महत्त्वपूर्ण समस्या त्यांनी सोडविली आहे.



महिलांच्या सक्षमीकरणासाठी सौ. शोभा जाधव यांनी विशेष पुढाकार घेत अनेक आरोग्य शिबिरे, व्यावसायिक प्रशिक्षण, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आदी उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या या कर्तृत्वाचा सन्मान म्हणून नालंदा आर्गनायझेशनतर्फे त्यांची आदर्श सरपंच म्हणून निवड करण्यात आली आहे. या पुरस्कार सोहळ्यात सरपंच प्रतिनिधी विष्णु पाटील जाधव, उपसरपंच विठ्ठल इडोळे, सदस्य विजय मुटकुळे, गणेशराव हिवाळे, नाजू शेगर, संतोष गव्हाणे, प्रदीप वानखेडे आकाश बोडखे आदींचा सुद्धा सन्मान करण्यात आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. रिसोड तालुक्यातील एक प्रभावशाली सरपंच म्हणून सौ. शोभा विजयकुमार जाधव यांनी आपली वेगळी छाप निर्माण केली आहे.

> नालंदा आर्गनायझेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात येणारा आदर्श सरपंच पुरस्कार हा खरोखर खुप प्रेरणादायी आहे. या पुरस्कारामुळे ग्रामस्तरावर काम करणाऱ्या लोकप्रतिनिधींचे मनोबल वाढते. एक महिला सरपंच म्हणून मला मिळालेला हा पुरस्कार ईतर महिला भगिनीसाठी प्रेरणा वाट आहे.
>
> **–सौ. शोभा जाधव**
> **सरपंच**
> **गणेशपुर–पाचंबा ता.रिसोड**

# साताऱ्यातील भाजपा नेता अडचणीत, ११२ कोटीच्यावर अपहार प्रकरणी शेखर चरेगावकर यांच्यासह ५० जणांवर गुन्हा दाखल

**दैनिक आपला विदर्भ**

**सातारा/प्रतिनिधी :** संगनमताने कट करून बोगस कर्जांच्या माध्यमातून यशवंत को-ऑपरेटीव्ह बँकेत ११२ कोटी १० लाख ५७ हजार रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी भाजपा नेते तथा सहकार परिषदेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर आणि फलटणचे माजी आमदार दिवंगत कृष्णचंद्र भोईटे यांचा मुलगा नरेंद्र भोईटे यांच्यासह संपूर्ण संचालक मंडळ, पाच वरिष्ठ अधिकारी आणि चरेगावकरांच्या नातेवाईकांसह ५० जणांवर शनिवारी रात्री उशिरा कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

बोगस कर्ज प्रकरणातून कोट्यवधींचा अपहार - कराड येथील यशवंत को-ऑपरेटीव्ह बँकेच्या लेखापरीक्षणात बोगस कर्ज प्रकरणाच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची अफरातफर झाल्याची बाब समोर आली. त्यानंतर सनदी लेखापाल मंदार शशिकांत देशपांडे यांनी यशवंत बँकेचे माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, कराड शाखेतील कर्ज विभागाचे शाखा व्यवस्थापक आणि शेखर चरेगावकर यांच्या नातेवाईकांविरोधात कराड शहर




पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

खोट्या नोंदी आणि दस्तावेजात फ रफार - या गुन्ह्याची थोडक्यात हकिकत अशी, यशवंत को-ऑप. बँक लि.कराड या बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, ५ अधिकारी, संचालक मंडळ आणि तत्कालीन अध्यक्ष शेखर चरेगावकर यांचे ९ नातेवाईक, अशा ५० जणांनी स्वत:च्या आर्थिक लाभासाठी बँकेचे आर्थिक नुकसान करून संगनमताने ११२ कोटी १० लाख ५७ हजार ४८१ रूपयांचा अपहार केला आहे. बोगस कर्ज प्रकरणासाठी बनावट कागदपत्रे तयार करून तारण न घेता हेतुपुरस्सर कर्ज वितरण केले. जुनी थकबाकी खाती बंद दाखवून नवीन खाती उघडून निधीचा उद्देशबाह्य विनियोग करून अन्यत्र निधी वळवला. तसंच दस्तावेजात फेरफार आणि खोट्या नोंदी केल्या. पदाचा गैरवापर करून बँकेच्या ठेवीदार व संभासदांच्या हितास बाधा निर्माण केली आहे.

अजामीनपात्र कलमांमुळे अटकेची टांगती तलवार - लेखापाल मंदार देशपांडे यांच्या फिर्यादीवरून कराड शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ६१, ३१६ (२),३१६ (४), ३१८ (४), ३३६ (३), ३३८, ३३९,३४० (२),३(५) प्रमाणे बँकेच्या तत्कालीन अध्यक्ष, उपाध्यक्षांसह एकूण ५० जणांवर अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे. ९ ऑगस्ट २०१४ ते ३१ मार्च २०२५ या दरम्यान यशवंत को-ऑप बँक लि. कराड याठिकाणी हा गुन्हा घडला असल्याचंही फिर्यादीत म्हटलं आहे. या गुन्ह्याचा तात्पुरता तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघमोडे यांच्याकडे देण्यात आला आहे. दरम्यान चरेगावकर हे कुणाचा फोन रिसीव्ह करत नाहीत. तसंच सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघमोडे यांनी आपल्याकडे तात्पुरता तपास असून उद्या या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला जाणार असल्याची माहिती दिली आहे.

## सुपरस्टार अमिताभ बच्चन यांच्या वाढदिवसानिमित्त जलसाबाहेर चाहत्यांची गर्दी

**मुंबई /प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता अमिताभ बच्चन आज ११ ऑक्टोबर रोजी आपला वाढदिवस साजरा करत आहेत. आता या विशेष दिवशी अभिनेत्याला शुभेच्छा देण्यासाठी अनेकजण त्यांच्या मुंबईतील जलसा घराबाहेर उभे आहेत. आज सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. शहंशाहच्या वाढदिवसानिमित्त अनेक ठिकाणी मिठाई आणि केक कापले जात आहेत. दरम्यान सकाळपासून बच्चन यांच्या जलसा बाहेर लोकांची गर्दी पाहायला मिळत आहे. तसेच अनेकदा चाहते अमिताभ बच्चन यांची एक झलक पाहाण्यासाठी त्याच्या घराबाहेर उभे राहतात. अमिताभ बच्चन यांच्या वाढदिवसाच्या दिवशी अनेक चाहते हे, त्यांच्या सारखा दिसणार लूक करत असून आपले फोटो सोशल मीडियावर पोस्ट करत आहेत. अमिताभ बच्चन यांना भेटण्यासाठी देशातील वेगवेगळ्या शहरातून अनेक लोक आले आहेत. रात्री १२:०० वाजता पासून शहंशाहची एक झलक पाहण्यासाठी चाहते आतुर होते. आता अमिताभ यांच्या घराबाहेर अनेक पोलीस तैनात केले गेले आहेत. जलसाच्या बाहेर अनेक चाहते असून रात्री अमिताभ बच्चन बाहेर आले नाही. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी विचारले असता त्यांनी बच्चन साहेब काही कारणामुळं बाहेर येणार असं सांगितल्यानंतर, चाहते हे नाराज झाले होते. मात्र तरीही या चाहत्यांमध्ये अमिताभ बच्चनबद्दलचे प्रेम कमी झालं नाही. काही चाहते जलसाबाहेर अमिताभ यांची वाट बघत होते.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना विद्यापीठाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड करत आदरांजली : विद्यापीठाने गीत गायन करत केले ४ विश्वविक्रम

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** 'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे वरचि असा दे...' या विद्यापीठ गीताचं सामूहिक गायन करून 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' करत राष्ट्रसंत तुकडोजी म हाराज यांना विद्यापीठानं आदरांजली अर्पण केलीय. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमानं जमनालाल बजाज प्रशासकीय भवनाजवळील मैदानावर या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. विश्वविक्रमी कार्यक्रम विद्यापीठानं गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसह एकूण ४ विश्वविक्रमाची ऐतिहासिक नोंद केली. या कार्यक्रमात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री म ाननीय नितीन गडकरी, सुप्रसिद्ध हास्य अभिनेता भारत गणेशपुरे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार डॉ. आशिष देशमुख उपस्थित होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी दिलेला करुणा, मानवता, बंधुभाव, एकात्मता, राष्ट्रप्रेम, तरुणांनी 'उद्योगी तरुण, वीर, शिलवान असावे' हा संदेश विद्यार्थ्यांसह समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या उद्देशानं या आगळ्यावेगळ्या आदरांजली कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होते.



विद्यापीठाच्या आवाहनाला विद्यार्थ्यांची विक्रमी साद : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यतिथीनिमित्त सामूहिक विद्यापीठ गीत गायन कार्यक्रमाला मोठ्या संख्येनं उपस्थित राहत विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या आवाहनाला विक्रमी साद दिली. उपक्रमात अतिशय कमी वेळेत प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी अतिशय सकारात्मक प्रतिसाद देत तब्बल एकूण ५२ हजारांपेक्षा अधिक नोंदणी करून या उपक्रमात सहभाग घेतला. यामध्ये १६ हजार पेक्षा अधिक प्रत्यक्ष उपस्थिती तर १५ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी डिजिटल प्लॅटफॉर्मवर सहभाग नोंदवीत विश्वविक्रमाला गवसणी घातली.

गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड : एकच गाणे गाणाऱ्या लोकांचा सर्वात म ोठा व्हिडिओ अल्बम (श्ररीसर्शीीं ेपश्रळपश ींळवशे रश्रर्लीा ेष शिश्रिश ीळपसळपस ींहश ीराश ीपस) या प्रकारात विद्यापीठाने 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' नोंदवला. या प्रकारामध्ये यापूर्वी ५ हजार लोकांच्या एकत्रित गीत गायनाचा असलेला वर्ल्ड रेकॉर्ड विद्यापीठानं शनिवारी मोडला. एवढेच नव्हे तर तब्बल १५,४०२ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या प्रतिनिधी इमा ब्रेन यांनी यावेळी विद्यापीठानं केलेल्या 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'ची घोषणा केली. त्याचप्रमाणे यावेळी माननीय कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भाप्रसे) यांच्यासह आयोजन समितीला वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र प्रदान केलं. सामूहिक विद्यापीठ गीत गायन कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यापीठाने गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसह आणखी ३ विश्व विक्रमाची नोंद केली.

राष्ट्रसंतांच्या मानवता धर्माचं अनुकरण करा - नितीन गडकरी : जग संघर्षाच्या उंबरठ्यावर असताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी दिलेला मानवतेचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश अधिक समर्पक ठरत असल्याचे प्रतिपादन माननीय केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. ''विद्यापीठाने स्वीकारलेल्या गीतातून राष्ट्रसंतांनी मानवतेचा सुंदर भाव दिला आहे. मानवतेच्या धर्मापेक्षा कोणताही धर्म, जात, पंथ मोठा नाही. मानवता धर्माचं अनुकरण करू हीच राष्ट्रसंतांना खरी आदरांजली होईल,'' असे गडकरी म्हणाले. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड केल्यानं विद्यापीठाचे त्यांनी अभिनंदन केले. सुप्रसिद्ध हास्य अभिनेता भारत गणेशपुरे यांनी ग्राम गीतेतील 'बायका मुलांची चिंता लागली म्हणून वैराग्य घेतले. आदी ओवींच्या माध्यमातून आपले जीवन कसे असावे याबाबत आपल्या विनोदी शैलीतून मार्गदर्शन केले. ''संसाराला त्रासलेला व्यक्ती वैराग्य घेत पुन्हा संसाराच्या आचरणाकडे कसा वळला, याबाबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेत सुंदर वर्णन केले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# पान एक वरून..

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक आणि सामाजिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल- सरन्यायाधीश

महानिरीक्षक संजय दराडे, जिल्हाधिकारी मनुज जिंदल आदी उपस्थित होते.

सरन्यायाधीश श्री. गवई यांच्या हस्ते कळ दाबून न्यायालय इमारत प्रांगणातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे तसेच म्युरलचे अनावरण करण्यात आले. यानंतर कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. न्यायदान कक्षाचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. दिवाणी न्यायाधीश श्रीमती जोशी यांना आसनावर विराजमान करण्यात आले. येथील ग्रंथालयाचेही उद्घाटन आणि पाहणी सरन्यायाधीशांनी यावेळी केली.

यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलच्या प्रांगणात झालेल्या समारंभात मार्गदर्शन करताना सरन्यायाधीश श्री. गवई म्हणाले, आजचा महत्त्वाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे. न्यायमूर्ती म्हणून मला २२ वर्षे पूर्ण झाली आहेत. कोल्हापूर खंडपीठाचे उद्घाटन आणि आजच्या मंडणगड न्यायालयाच्या इमारतीचे उद्घाटन हे दोन्ही कार्यक्रम माझ्या २२ वर्षाच्या सेवेमधील महत्त्वाचे आहेत. अतिशय कमी वेळेत मंडणगड येथे न्यायालय सुरु करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. मंडणगड न्यायालयाच्या भूमिपूजनाला आम्ही दोघे उपस्थित होतो आणि आजच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमालाही आम्ही दोघे उपस्थित आहोत. हा गौरवाचा क्षण आहे. महाराष्ट्र शासन विशेषत: विधी व न्याय विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे मी आभार मानतो, त्यांनी मला या इमारतीच्या उद्घाटनाची संधी दिली.

अवघ्या २० दिवसात कोल्हापूर येथील जुन्या इमारतीचा कायापालट करुन खंडपीठ सुरु केले. नाशिक, नागपूर, मंडणगड येथील इमारती पहा. विविध तालुक्यातील न्यायालयांच्या इमारती, माझ्या दर्यापूर तालुक्यातील इमारत पहा. मी अभिमानाने सांगू शकतो, देशातील कुठल्याही तालुक्यामध्ये या स्तरीची न्यायालये असणार नाहीत. एवढ्या सुंदर इमारती देशातल्या कुठल्याही तालुक्यात असणार नाहीत. एवढ्या सुंदर इमारती महाराष्ट्र शासनाने उभ्या केल्या आहेत, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, ८ ऑक्टोबर २०२३ रोजी सरन्यायाधीश गवई आणि मी या न्यायालयाचे भूमिपूजन केले. दोन वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिशय सुंदर इमारत उभी केली आहे. कोल्हापूरचे खंडपीठ झाले, सरन्यायाधीश गवईंच्या नेतृत्वात आणि सल्ल्याने हा प्रवास २०१४ पासून सुरु झाला. न्यायालय आणि राज्य शासन यामध्ये दुवा म्हणून ते लक्ष देत आहेत. सातत्याने त्यांचे लक्ष राहीले होते. २०१४ ते २०२५ पर्यंत जवळपास दीडशे न्यायालये आणि इमारतींना मान्यता दिली आणि त्याचे काम सुरु केले. त्यातील अनेक इमारती पूर्ण केल्या आहेत. याचे श्रेय सरन्यायाधीश गवई यांना जाते. सातत्याने राज्य शासना बरोबर संवाद करुन आणि त्यातील अडचणी दूर करुन आमच्याकडून या सगळ्या गोष्टी करवून घेतल्या. मी वकील असल्यामुळे उपमुख्यमंत्री असताना विधी व न्याय हा विभाग माझ्याकडे मागून घेतला होता. उपमुख्यमंत्री शिंदे हे मुख्यमंत्री असताना २९ वेगवेगळ्या न्यायालयीन पायाभूत सुविधांना मान्यता दिली. चिपळूण न्यायालय इमारतीची केलेली मागणी तत्काळ मंजूर करु. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंबडवे येथील स्मारकाच्या आराखड्याला वेग देण्याचे काम करु, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मंडणगडचे न्यायालय हे अतिशय महत्त्वाचे आहे. या न्यायालयामुळे चार-साडेचार लाख लोकांना हे न्यायालय मध्यवर्ती ठिकाण असणार आहे. यामुळे लोकांचा प्रवास, पैसा वाचणार आहे. ही केवळ इमारत नसून, लोकांकरिता न्यायदानाची एक गतीशील व्यवस्था तयार झाली आहे. याचे शंभर टक्के श्रेय सरन्यायाधीश गवई यांचे आहे. प्रलंबित खटले वेगांनी निकाली निघतील. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला सुंदर संविधान दिले आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला संधीची समानता देखील आहे आणि प्रत्येकाला न्याय देखील आहे. राज्य शासन म्हणून ही जबाबदारी चांगल्या पध्दतीने पार पाडू, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## बिहारमध्ये एनडीएचे जागावाटप ठरले

मुद्दा जनतेपर्यंत पोहोचवू.

बिहारचे पक्षीय बलाबल

एकूण सदस्यसंख्या - २४३

राष्ट्रीय जनता दल - ७९

भारतीय जनता पक्ष - ७८

जनता दल (युनायटेड) - ४५

काँग्रेस - १९

बिहारमध्ये दोन टप्प्यात मतदान

केंद्रीय निवडणूक आयोगानं जाहीर केल्यानुसार, बिहारमध्ये २४३ जागांसाठी दोन टप्प्यात मतदान पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यात १२१ जागांसाठी मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यातील मतदान ६ नोव्हेंबरला होणार आहे. बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्याचं मतदान ११ नोव्हेंबरला होणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील मतदान १२२ जागांवर होणार आहे. तर, मतमोजणी १४ नोव्हेंबरला होणार आहे.

बिहार निवडणुकीतील एनडीएची रणनीती

भाजप आणि जदयू या दोन प्रमुख पक्षांनी पुन्हा एकदा एकत्र येत मतदारसंघनिहाय रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. चिराग पासवान यांच्या पक्षालाही या वेळेस महत्त्वपूर्ण वाटा देऊन एनडीएने छोट्या पक्षांनाही आपल्यात सामावून घेतलं आहे.

# डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम राज्यातील प्रत्येक शासकीय शाळेत पोहचणार जागतिक दर्जाचे शिक्षण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :गणित आणि विज्ञान विषयातील प्रत्येक विद्यार्थ्याचे पायाभूत ज्ञान दृढ करण्यावर शासनाने भर दिला आहे. या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनामार्फत 'डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम' राबविण्यासाठी खान अकॅडमीसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन आणि कुतूहल यांचा वारसा विद्यार्थ्यांमध्ये रुजविणारे प्रख्यात वैज्ञानिक डॉ.जयंत नारळीकर यांच्या सन्मानार्थ हा उपक्रम राबविला जात असून सुमारे ५० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल.

या कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राज्यातील सुमारे ६२ हजारांहून अधिक जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीसाठी खान अकॅडमीची जागतिक दर्जाची आणि महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रमाशी संलग्न असणारी गणित आणि विज्ञान विषयक शैक्षणिक सामग्री (डिजिटल कंटेंट) अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत समाविष्ट केली जाईल. ही शैक्षणिक सामग्री मराठी व इंग्रजी भाषेत उपलब्ध असणार आहे. यातील व्हीडिओ वापरून शिक्षक वर्गामधील अध्यापन अधिक समृद्ध करू शकतील तसेच विद्यार्थ्यांना व्हिडिओ-आधारित धडे आणि सराव प्रश्नांच्या माध्यमातून शाळेत व घरच्या घरी संकल्पनात्मक आकलन दृढ करण्याची संधी मिळेल. या भागीदारीचा भाग म्हणून, खान अकॅडमी इयत्ता सहावी ते दहावीसाठी असणारी विज्ञान विषयक शैक्षणिक सामग्री आता इंग्रजी आणि मराठी भाषेत तसेच महाराष्ट्र राज्य मंडळाशी संलग्न स्वरूपात उपलब्ध करून देणार आहे. याशिवाय, राज्यस्तरीय



शिष्यवृत्ती परीक्षांसाठी मराठी व इंग्रजी भाषेत शिष्यवृत्ती तयारी अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात आला आहे. डिजिटल संसाधने वापरून अध्यापन प्रभावी करता यावे आणि विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षणाचा अनुभव देता यावा या उद्देशाने राज्यातील सर्व शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अध्यापन सहायक '' मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम राज्य शिक्षण विभाग (शालेय शिक्षण आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली) आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राबविला जाणार आहे. याचे सनियंत्रण जिल्हा शिक्षण अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांच्या देखरेखीखाली, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या साहाय्याने केले जाईल. यासाठी वास्तव-वेळेतील माहिती देणारा रियल टाइम प्रोग्राम डॅशबोर्ड वापरला जाईल. यामध्ये विद्यार्थ्यांचा वापर, अध्ययनात घालवलेला वेळ व अध्ययन निष्पत्ती यांची माहिती मिळेल. यामुळे विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रगतीचे पारदर्शक पद्धतीने निरीक्षण करता येईल.

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी नैसर्गिक आपत्ती मदत जाहीर केल्याबद्दल राज्य शासनाचे मानले आभार

**बुलढाणा/प्रतिनिधी** : केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारच्या वतीने भरीव मदत जाहीर केली आहे पूर्वीच्या जाचक अटी कमी करण्यात आल्या आहेत . मदतीचे क्षेत्र दोन हेक्टर वरून हे तीन हेक्टर पर्यंत केला आहे अशी माहिती केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली आहे बुलढाणा जिल्ह्यातील तेरा जून ते सप्टेंबर या कालावधीत अतिवृष्टी झाली होती सर्व तालुके नैसर्गिक आपदग्रस्त म्हणून जाहीर होतील अशी अपेक्षा होती मात्र १३ पैकी चार तालुके तांत्रिक कारणामुळे आपदग्रस्त मदतीपासून वंचित राहिले होते . ही बाब राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री आणि मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील तेराही तालुक्यांचा समावेश नैसर्गिक आपदग्रस्त नुकसान यादीमध्ये करण्यात आला आहे असेही त्यांनी यावे सांगितले त्यामुळ नैसर्गिक आपत्तीचा लाभ आता बुलढाणा जिल्ह्यातील सर्वांना मिळणार आहे त्याबद्दल त्यांनी जनतेच्या वतीने राज्य



सरकारचे आभार मानले

# ८.१२ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ ची परतफेड

**मुंबई/प्रतिनिधी** :महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ८.१२ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ अदत्त शिल्लक रकमेची १२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत देय असलेल्या व्याजासह १३ नोव्हेंबर २०२५ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाच्या सचिव (वित्तीय सुधारणा) श्रीमती शैला ए. यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे.

''परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१'' अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुट्टी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर १३ नोव्हेंबर, २०२५ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप-विनियम २४ (२) व २४ (३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाद्वारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.

# माझं संरक्षण माझी जबाबदारी ; मातृशक्ती जागर समितीकडून महिला मुलींना आत्मसंरक्षणाचे शस्त्र प्रदान






दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : महिलांवरिल वाढत्या अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर महिलांना सक्षम बनवून आत्मसंरक्षणासाठी तयार करण्याच्या उदात्त हेतूने येथील बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील मातृशक्ती जागर समितीने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि स्तुत्य उपक्रम हाती घेतला. माझं संरक्षण माझी जबाबदारी या विचारावर जोर देत, समितीने एका भव्य समारंभात हजारो महिला व मुलींना आत्मसंरक्षणासाठी आवश्यक असलेले विशेष शस्त्र व्याख्याते सोपान कानेरकर यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

प्रबोधन आणि सुरक्षा समितीचे दुहेरी उद्दिष्ट मातृशक्ती जागर समितीचा हा उपक्रम केवळ शस्त्रांचे वितरण करण्यापुरता मर्यादित नव्हता, तर यामागे एक व्यापक सामाजिक उद्दिष्ट होते. समारंभाच्या माध्यमातून महिला व मुलींना त्यांच्या अधिकारांविषयी आणि आत्मसंरक्षणाच्या गरजेविषयी प्रबोधन करण्यात आले.समाजातील महिला व मुलींचे संरक्षण सुनिश्चित करणे आणि त्यांना स्वतःच्या सुरक्षेसाठी सक्षम बनवणे मातृशक्ती जागर समितीने उचललेले हे पाऊल महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे आणि अनुकरणीय उदाहरण आहे.

# नागपूरात सिंधु एकता मंचाचं लव्ह जिहाद आणि धर्मांतराविरोधात भव्य आंदोलन

## समाजाच्या एकतेचा आणि संस्कृतीच्या जतनाचा ठोस संदेश

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : वाढत्या लव्ह जिहाद आणि बेकायदेशीर धर्मांतर यांच्या घटनांविरोधात नागपूरातील सिंधी समाज एकत्र आला. सिंधु एकता मंचतर्फे आज शहरात भव्य आंदोलनाचं आयोजन करण्यात आलं. राजकुमार केवलरामाणी शाळेजवळून सुरुवात झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने समाजातील युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

''सिंधु संस्कृती वाचवायची आहे हिंदुत्वाची अलख पेटवायची आहे!'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. आंदोलन शांततेत पार पडले असून, समाजातील सर्व घटकांनी एकात्मतेचा व सामाजिक जागरूकतेचा संदेश दिला.

आंदोलनानंतर सिंधु एकता मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी जरीपटका पोलीस ठाण्यात जाऊन निवेदन सादर केले. या निवेदनात लव्ह जिहाद आणि धर्मांतरासारख्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी आणि समाजाच्या सुरक्षेसाठी सरकारने कडक कायदे करावेत, अशी मागणी करण्यात आली. छत्तीसगड येथील जुलेलाल मंदिराचे साईलाल दास




यांनी या आंदोलनात सहभागी होताना सांगितले.

''सिंधु संस्कृती ही आमची ओळख आहे. समाजाच्या सुरक्षेसाठी आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी सरकारने कठोर पावलं उचलली पाहिजेत.''


या आंदोलनातून नागपूरातील सिंधी समाजाने आपली एकता, सांस्कृतिक अभिमान आणि सामाजिक जबाबदारी यांचा ठोस प्रत्यय दिला. समाजातील तरुणांनी 'सिंधु संस्कृती जपू या' या भावनेने सहभाग घेतल्याने नागपूरात एकतेचा संदेश झळकला.

सिंधु एकता मंचाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासह विविध सामाजिक संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला. संपूर्ण आंदोलन शिस्तबद्ध आणि शांततेत पार पडल्याने पोलिस प्रशासनानेही समाधान व्यक्त केले ''सिंधु संस्कृती आमचा अभिमान आहे. या संस्कृतीवर कुठलाही आघात होऊ देणार नाही.''

# सोन्या-चांदीच्या भावात बुलेट ट्रेनच्या वेगाने वाढ!

## दिवाळीपूर्वी दरवाढीने ग्राहक हैराण; खामगावच्या बाजारपेठेत विक्रमी उलाढाल

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** दिवाळी आणि लग्नसराईच्या तोंडावर सोन्या-चांदीच्या भावात अक्षरशः बुलेट ट्रेनच्या वेगाने वाढ होत आहे. गेल्या काही दिवसांत दरात झालेली झपाट्याने वाढ पाहता ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसली आहे.

खामगाव येथील चांदीची बाजारपेठ देशभरात प्रसिद्ध असल्यामुळे, देशाच्या विविध भागांतून ग्राहक येथे खरेदीसाठी येतात. परंतु सध्या वाढत्या किमतींमुळे अनेकांचे बजेट कोलमडले आहे.

**दरवाढीमागची जागतिक कारणं**

सोन्याच्या दरवाढीमागे आंतरराष्ट्रीय घटकांचा मोठा प्रभाव दिसतो.

रशियायुक्रेन युद्ध, इस्त्राईलगाझा संघर्ष, अमेरिकन फेडरल बँकेचे व्याजदर घटवणे, अमेरिकेतील शटडाऊन परिस्थिती, या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून अनेक देशांच्या सेंट्रल बँकांनी आपली गुंतवणूक सुरक्षित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सुवर्ण खरेदी सुरू केली आहे. परिणामी, जागतिक स्तरावर सोन्याच्या किमतींनी उच्चांक गाठला आहे.

**चांदीच्या भावाने गाठला नवा उच्चांक**

फक्त सोनंच नव्हे, तर चांदीच्याही भावात विक्रमी वाढ झाली आहे.एका महिन्यात तब्बल ५५ हजार रुपये प्रति किलोची वाढ नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे ग्राहकांपुढे आता ''खरेदी करावी की थांबावे?'' असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**ग्राहकांचा गोंधळ आणि व्यापाऱ्यांची चिंता**

दिवाळी आणि लग्नसराईच्या काळात सोने-चांदीची खरेदी वाढते. मात्र यंदा दरवाढीमुळे सर्वसामान्य ग्राहक गोंधळात पडले आहेत. अनेकांनी खरेदी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.

डॉ. कमल जांगीड (चांदी व्यावसायिक) म्हणाले, ''जागतिक बाजारपेठेतील तणाव आणि गुंतवणुकीसाठी वाढती मागणी यामुळे सोने आणि चांदीच्या दरात झपाट्याने वाढ झाली आहे. पुढील काही आठवड्यांतही ही वाढ कायम राहण्याची शक्यता आहे.''

एक ग्राहक सांगतात, दररोज सोन्या-चांदीच्या भावात एवढी वाढ होत आहे की, आता खरेदी करणं आवाक्याबाहेर गेलंय. दिवाळीत दागिने घ्यायचं स्वप्न महाग पडलं आहे. वाढत्या दरांनी व्यापारी आणि गुंतवणूकदार आनंदी असले तरी सर्वसामान्य ग्राहक मात्र चिंतेत आहेत. सध्याच्या घडीला सोनं आणि चांदी या दोन्ही धातूंनी सर्व उच्चांक मोडीत काढले असून, दरवाढीचा हा वेग ''बुलेट ट्रेन''लाही मागे टाकतोय असं चित्र बाजारात दिसत आहे.

# महाप्रसाद तयार करताना कुकरचा स्फोट;१४ जण जखमी, सहा गंभीर

## हनुमान मंदिरातील घटनेने शहर हादरले; जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू

दैनिक आपला विदर्भ





**भंडारा/प्रतिनिधी :** भंडारा शहरातील बाबा मस्तानशहा वार्डातील हनुमान मंदिरात रविवारी सायंकाळच्या सुमारास मोठी दुर्घटना घडली. महाप्रसाद तयार करण्याचं काम सुरू असताना अचानक प्रेशर कुकरचा स्फोट झाला. या दुर्घटनेत १४ जण जखमी झाले असून त्यापैकी सहा जणांची प्रकृती गंभीर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

**स्फोटाने परिसरात एकच गोंधळ**

सायंकाळी साधारण सहा वाजताच्या सुमारास मंदिरात महाप्रसादाची तयारी सुरू होती. त्या वेळी स्वयंपाकघरात ठेवलेला प्रेशर कुकर अचानक फुटला. स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की आसपासच्या घरांमध्ये धक्कादायक कंप जाणवला. काहीजण भाजल्याने, तर काहीजणांना कुकरचे झाकण व तुकडे लागल्याने गंभीर दुखापत झाली.

**जखमींवर तत्काळ उपचार**

स्थानिक नागरिक आणि मंदिर समितीतील सदस्यांनी तत्काळ जखमींना भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्वांची प्रकृती सध्या स्थिर असून धोका टळला आहे.

**जखमींची नावे**

जखमींमध्ये परवेज शेख, भावेश खंगार, रितेश साठवणे, आशिष गणविर, ज्योति नान्हे, विकी गणवीर, साधना गणवीर, गिता आंबुलकर, माया मारवाडी, चिऊ मारबाडे, सविता साठवणे यांच्यासह इतर काही जणांचा समावेश आहे.

# बीबी ग्रामपंचायतीकडून शेतकऱ्यांना दिलासा

## घरपट्टीत सूट देत सहकार्याची भूमिका




दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** लोणार पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या बीबी ग्रामपंचायतीने यावर्षी शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन अत्यंत संवेदनशील निर्णय घेतला आहे. सरपंच चंदाबाई गुलमोहर यांच्या पुढाकारातून व ग्रामपंचायतीच्या एकमताने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी घरपट्टीवर सूट देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे.

या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले गेले असून शेतीचा खर्च, खतं-बियाणं यांचे वाढलेले दर यामुळे त्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. अशा स्थितीत ग्रामपंचायतीने घेतलेला हा निर्णय म्हणजे बळीराजासाठी थोडासा दिलासा ठरला आहे.

सरपंच चंदाबाई गुलमोहर, उपसरपंच भास्कर खुळे, ग्रामविकास अधिकारी अमोल मोरे तसेच ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपस्थितीत झालेल्या सभेत हा ठराव घेण्यात आला या ठराव घेत असताना सूचक म्हणून सौ त्रिवेणी संदीप बनकर यांनी केले व अनु मोदन म्हणून दिलीप चव्हाण यांनी केले ''समाजामध्ये आल्यानंतर काहीतरी परत द्यावं लागतं'' या विचारातून ग्रामपंचायतीने हा उपक्रम राबवला असून यामागे ग्रामपंचायतीचा सामाजिक भान स्पष्ट दिसून येते. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना थोडाफार आर्थिक दिलासा मिळेल, तसेच ग्रामपंचायतीने दाखवलेल्या संवेदनशीलतेचा संदेश इतर गावांनाही प्रेरणादायी ठरेल, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

ग्रामपंचायतीच्या या सहकार्याच्या भूमिकेचे बीबी व परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, ''बळीराजा अडचणीत असताना त्याला आधार देणारा हात पुढे केला पाहिजे'' अशी भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे. बीबी ग्रामपंचायत ही केवळ प्रशासनिक संस्था न राहता लोकाभिमुख आणि समाजाभिमुख कार्य करणारी संवेदनशील संस्था असल्याचे या निर्णयाने पुन्हा सिद्ध केले आहे. हा निर्णय जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्रामध्ये कुठेही ग्रामपंचायतने घेतलेल्या नसेल असे नागरिकांना चर्चा होत आहे.

# नागरे महाविद्यालयातील शेख अर्शद कुस्ती स्पर्धेत पटकावले चांदीचे पदक

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**बिबी :** स्थानिक दुसरबीड नारायणराव नागरे महाविद्यालय दुसरबीड जिल्हा.बुलढाणा येथील बी. ए. प्रथम वर्षाचा विद्यार्थी शेख आर्षद याला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालय कुस्ती स्पर्धा दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजी नेहरू महाविद्यालय नेर,जिल्हा यवतमाळ येथे आयोजित करण्यात आल्या होत्या.

क्रीडा स्पर्धेत सिल्वर मेडल मिळाल्याबद्दल संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष माजी आमदार तोतारामजी कायंदे व महाविद्यालचे प्राचार्य डॉ. विजय नागरे अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या उपस्थितीततसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठव्यवस्थापन परिषद सदस्यडॉ. विद्याताई शर्मा श्रीमती नरसम्मा महाविद्यालय अमरावती तसेच अकोला येथील डॉ. आशिष राऊत श्री.शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या हस्ते पिता पुत्रा स्वागत व सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. गणेश घुगे यांनी या कार्यक्रमा संदर्भात प्रास्ताविक मांडले तसेच सूत्रसंचालन प्रा. डॉ. दीपक देशमाने यांनी केले. तसेच या कार्यक्रमासाठी प्रा. सुधाकर तारे प्रा. भगवान शिंदे प्रा. देवानंद नागरे प्रा.मिलिंद गवई प्रा.सत्यम श्रीवास्तव प्रा.जगदीश यादव प्रा. शंकर मेहेर श्री गजानन मुंढे श्री अनिल रणमळे शारीरिक शिक्षण विभाग तसेच प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून त्या विद्यार्थ्याला शुभेच्छा देण्यात आल्या व त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### कबुतराची सुटका करताना विजेचा झटका बसून अग्निशमन जवानाचा मृत्यू, एक जवान जखमी

**ठाणे/प्रतिनिधी :** विद्युत वाहक ओव्हरहेड वायरवर अडकलेल्या कबुतराची सुटका करताना अग्निशमन दलाच्या जवानाचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी दिवा-शीळ रोडवर घडली. उत्सव पाटील (२८) रा. दातिवली गाव असं मृत्यू झालेल्या जवानाचं नाव आहे. या दुर्घटनेत त्याचा साथीदार आझाद पाटील (२९) रा. वाडा हा जवान जखमी झाला आहे.दिवा-शीळ रोडवरील खर्डीगाव येथे टोरंट कंपनीच्या ओव्हरहेड वायरवर कबूतर अडकल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. त्यानुसार अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान उत्सव पाटील आणि आझाद पाटील हे दोघे कबुतराची सुटका करत असताना त्यांना विजेचा जोरदार झटका बसला. त्यांना तातडीने कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उत्सव पाटील याला मृत घोषित केलं. या दुर्घटनेत दुसरा जवान आझाद पाटील हा होरपळला असून त्याच्या हात आणि छातीला भाजलं आहे. त्याच्यावर कळवा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच उपायुक्त दिनेश तायडे, अग्निशमन दलाचे मुख्य अधिकारी गिरीश झळके यांच्यासह अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कळवा रुग्णालयात धाव घेत माहिती घेतली.

# बिबी तालुका लोणार येथील वसंतराव नाईक उच्च माध्यमिक विद्यालयाचे अंडर १९ खेळाडूंची शालेय क्रिकेट स्पर्धेमध्ये विभागीय स्तरावर निवड

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**बिबी :** मलकापूर येथील क्रीडा संकुल येथे १० व ११ ऑक्टोबर रोजी झालेल्या जिल्हा स्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा अंतर्गत येणाऱ्या क्रिकेट या खेळाच्या जिल्हा स्तरीय स्पर्धेमध्ये बिबी येथील वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालयाचे अकरावी बारावीच्या विद्यार्थ्यांनी लोणार तालुक्याचे प्रतिनिधित्व करून लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत आठ शटकात ५८ धावांचे टार्गेट देऊन चमकदार कामगिरी करीत मेहकर तालुका प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यार्थ्यांना २१ धावांनी पराभूत करून घवघवीत यश मिळवून विभागीय स्तरावर खेळण्यास पात्र ठरल्याने लोणार तालुक्यातून विद्यार्थ्यांचे कौतुक केले जात आहे. या सामन्यात ३७ धावांची उत्कृष्ट खेळी तसेच २ ओव्हर मध्ये ४ विकेट घेणारा विद्यार्थी शिवप्रसाद जितेंद्र चव्हाण हा मॅन ऑफ द मॅच चा मानकरी ठरला.

मलकापूर येथे १० व ११ ऑक्टोबर रोजी झालेल्या जिल्हा स्तरीय अंडर नाईन्टीन लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत लोणार तालुक्याचे प्रतिनिधित्व करताना वसंतराव नाईक महाविद्यालय बिबी चे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट रीतीने, जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्न करून क्रिकेट सामने जिंकून फायनल मॅच खेळून जिल्हा स्तरीय विजेतेपद मिळवून घवघवीत यश संपादन केले .व विभागीय स्तरावर खेळण्यासाठी पात्र ठरल्याने वसंतराव नाईक महा महाविद्यालयाचे विद्यार्थी विभाग स्तरीय स्पर्धे चे नेतृत्व करणार असल्याने बुलढाणा जिल्ह्याचे नावलौकिक खेळाडू विद्यार्थ्यांनी वाढविला या यशाबद्दल महाविद्यालयाचे अध्यक्ष अभय चव्हाण यांनी खेळांमध्ये यश संपादन करून शाळेचे नाव विभागीय स्तरावर नेल्याबद्दल शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांचा सत्कार करून विभागीय स्तरावर यश मिळविण्यासाठी शुभेच्छा दिल्या.या खेळामध्ये सहभागी झालेले अजिंक्य आटोळे, गणेश खंडागळे, युवराज गरकळ, संकेत खटके, मयूर आटोळे, धनराज अंभोरे, सुमित राठोड, शिवप्रसाद चव्हाण, सोहम चव्हाण, संकेत बनकर, सुमित मोरे, शिवांग नागरे, विवेक खार्डे, प्रथमेश डुकरे, वसीम चौधरी, धीरज चव्हाण, प्रेम दराडे, या विद्यार्थ्यांना क्रीडा मार्गदर्शक प्रा.विजय बाजड सर व प्रा अंकित चनखोरे सर, क्रीडा शिक्षक तसेच उपप्राचार्य श्री एस आर राठोड सर यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य आर. बी. राठोड व सर्व प्राध्यापक,शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढे होणाऱ्या विभागीय स्तरावर घवघवीत यश मिळविण्यासाठी शुभेच्छा दिल्या